सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# जिल्हा परिषद, गडचिरोली

(ग्राम पंचायत विभाग)

ग्रा.पं. विभाग, जि.प. गडचिरोली तळ मजला, खोली क्र. 19, जिल्हा पेसा कक्ष, मुल रोड, कॉम्पलेक्स गडचिरोली 442605
दुरध्वनीक्र. 07132-222308 ईमेल- dceopanchayatgadchiroli@gmail.com

| | |
|---|---|
| जा.क्र./जिपग/साप्रवि/पंचा/स्था-3/172/2026-27 | दिनांक :20 जूलै, 2026 |

**अत्यंत महत्वाचे**

प्रती,

**गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती, अहेरी, आरमोरी, भामरागड,**
**चामोर्शी, देसाईगंज, धानोरा, गडचिरोली, एटापल्ली,**
**कोरची, कुरखेडा, मुलचेरा, सिरोंचा**

**विषय :** ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावरील प्रत्येक पायाभूत विकास कामांसाठी युनिक पायाभूत सुविधा आयडी तयार करण्याबाबत.

**संदर्भ-** 1. शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : युपासू-2025/प्र.क्र.07/का. 1412 दिनांक 09 जून 2025
2. सहाय्यक प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांचे कडील पत्र जा क्र प्रअगड/ठबायो/2026/प्रक्र./1282/2026 दिनांक 03 जुलै 2026

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, कळविण्यात येत आहे की, संदर्भ क्रमांक 01 मधील शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती स्तरावर प्रत्येक पायाभूत विकास कामांसाठी पायाभूत युनिक आयडी क्रमांक तयार करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, संत सेवालाल बंजारा/लभाणा तांडा समृध्दी योजना, पेसा 5 टक्के थेट निधी योजना, वित्त आयोगाअंतर्गत पायाभूत कामे, DMF अंतर्गत पायाभूत कामे, जन सुविधा, नागरी सुविधा अंतर्गत पायाभूत विकास कामे, तसेच शासनाच्या इतर कोणत्याही योजने अंतर्गत मागिल पाच वर्षामध्ये (2020-2025) आपल्या कार्याक्षेत्रातील झालेल्या विकास कामांचे तसेच सद्यस्थितीमध्ये कार्यन्वित/प्रस्तावित असलेल्या पायाभूत विकास कामांचे ऑनलाईन नोंदी करणे, विकास कामांची पायाभूत युनिक आयडी (MHU-ID) तयार करणे बंधनकारक आहे.

तसेच सन 2026-27 या आर्थिक वर्षांमध्ये प्रशासकीय मान्यता भेटलेल्या पायाभूत विकास कामांचे पायाभूत यूनिक आयडी (MHU-ID) तयार करुनच विकास कामांना सुरुवात करावी.

तेव्हा संदर्भ क्रमांक 1 च्या शासन निर्णयाचे अवलोकन करुन ग्रामपंचायत स्तरावर योग्य त्या सुचना निर्गमित करण्यात यावे.

(पंकज के. भोयर)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

प्रतिलिपी :

1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.
2. मा. संचालक, (पेसा) राज्य पेसा कक्ष, पुणे, राज्य महाराष्ट यांना माहितीस सविनय सादर
3. मा. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.

-स्वा-

(पंकज के. भोयर)

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)**

**जिल्हा परिषद, गडचिरोली**